# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय** जा.क्र. : अम/सका- ०२ दिनांक : २२-०७-२०२०.

अहमदनगर महानगरपालिकेच्या विशेष सभेची सुचना (ऑनलाईन ॲप व्दारे)

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (ड) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०२, गुरुवार दिनांक - ३० / ०७ /२०२०.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती............................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

महोदय,

याद्वारे कळविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेची विशेष सभा क्रमांक - २ **गुरुवार दिनांक ३०/०७/२०२० रोजी दुपारी १.०० वाजता** मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन ॲप व्दारे सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

तरी आपणांस सदर सभेस ॲप व्दारे ऑनलाईन सहभागी होण्याची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी
३. मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०३ जुलै २०२० रोजीचे पत्र.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**टिप :-** १) प्रत्येक सदस्याने आपल्या Android / Smartphone मध्ये Playstore वरुन AMC Corporator official What's App मध्ये निर्देश दिल्यानुसार ॲप डाउन लोड करुन घेणे.
२) वरिलप्रमाणे ॲप व्दारे प्रत्येक सदस्यांना मा.महासभेस उपस्थित राहता येईल.
३) मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये कळविले नुसार सदरची सभा ऑनलाईन ॲप व्दारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रिये संदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा. सदस्यांनी महानगरपालिका सिस्टीम मॅनेजर श्री.अंबादास साळी मो.नं.९५६१००४६४४ यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक - २

गुरुवार दिनांक - ३० / ०७ / २०२० रोजी दुपारी १.०० वाजता मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन अॅप व्दारे होणा-या विशेष सभेची विषय पत्रिका.

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| १९ | मा.स्थायी समितीच्या निवृत्त होणा-या आठ सदस्यांच्या जागी नवीन सदस्यांची नेमणूक करणेबाबत. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : २२ / ०७ /२०२०.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १९** **दिनांक : ३० / ०७ /२०२०.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समितीच्या निवृत्त होणा-या आठ सदस्यांच्या जागी नवीन सदस्यांची नेमणूक करणेबाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- दिनांक ३१/०१/२०२० रोजीचे स्थायी समितीची सभा क्र.८

विनंतीपुर्वक रिपोर्ट सादर करण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या १६ सदस्यांपैकी आठ सदस्य दिनांक ०१/०२/२०२० रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २० (३) नुसार संदर्भीय सभेमध्ये निवृत्त झाले आहेत. त्यांचे जागी नवीन सदस्य नेमणूक करावयाचे आहेत. यासंबंधी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये पुढील प्रमाणे तरतूदी आहेत.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम २० स्थायी समितीची रचना :-**

(१) स्थायी समितीत १६ (सोळा) पालिका सदस्य असतील.

(२) महानगरपालिकेने सार्वत्रीक निवडणुकांनंतर आपल्या पहिल्या सभेत आपल्या पालिका सदस्यांपैकी सोळा व्यक्तिंची स्थायी समितीचे सदस्य म्हणून नेमणूक केली पाहिजे.

(३) स्थायी समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक वर्षी पोट कलम (२) मध्ये उल्लेख केलेली महानगरपालिकेची पहिली सभा ज्या महिन्यात भरेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस दुपारी निवृत्त होतील.

(४) पोट- कलम (२) अन्वये निवडून आल्यानंतर एक वर्षाने पोटकलम (३) मध्ये विर्निदिष्ट केलेल्या त्यांच्या निवृत्तीच्या तारखेपुर्वी स्थायी समितीचा सभापती ठरविल अशा वेळी व अशा रीतीने चिठ्ठया टाकून ठरविण्यात येईल आणि त्यानंतर पुढील वर्षी स्थायी समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जास्तीत जास्त काळपर्यंत असतील ते निवृत्त होतील.

परंतू पुन्हा नेमण्यात आलेल्या सदस्याच्या बाबतीत,या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी त्याच्या पदाची मुदत त्याच्या फेरनेमणुकीच्या तारखेपासून मोजण्यात येईल.

(५) महानगरपालिकेने पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निवृत्तीच्या तारखेच्या मागील महिन्यातील आपल्या पहिल्या सभेत उक्त तारखेस जे सदस्य निवृत्त होणार असतील त्या सदस्यांच्या पदाच्या जागा भरण्यासाठी स्थायी समितीच्या नवीन सदस्यांची नेमणूक केली पाहिजे.

(६) जो कोणताही पालिका सदस्य स्थायी समितीचा सदस्य म्हणून असण्याचे बंद होईल तो पुन्हा नेमला जाण्यास पात्र असेल.

तसेच या रिक्त पदांवर सदस्य नेमणुकीकरीताची पध्दती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ३१ -अ मध्ये पुढील प्रमाणे नमुद केली आहे.

**३१-अ. प्रमाणशीर प्रतिनिधित्व देउन समित्यांवर नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे :-**

(१) कोणत्याही समितीवरील पालिका सदस्याची नियुक्ती ही त्याने धारण केलेल्या कोणत्याही पदाच्या आधारे असेल अशी ज्याबाबतीत या अधिनियमाव्दारे तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, पुढील समित्यांच्या बाबतीत या अधिनियमात अथवा तदन्वये केलेल्या नियमात किंवा उपविधींमध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, महानगरपालिकेव्दारे या समित्यांवर केली जाणारी पालिका सदस्यांची नियुक्ती ही, पोट-कलम (२) च्या तरतुदींनुसार पालिका सदस्यांचे नाम निर्देशन करून करण्यात येईल- मग ही नियुक्ती नियमित पदावरील असो किंवा नैमित्तीक रिक्त पदावरील असो -

(अ) स्थायी समिती,

(ब) परिवहन समिती,

(क) कलम ३० अन्वये नियुक्त केलेली कोणतीही विशेष समिती,

(ड) कलम ३१ अन्वये नियुक्त केलेली कोणतीही तद्र्थ समिती,

(२) समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करताना, महानगरपालिका, मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल आणि सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व अशा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता यांच्याशी विचारविनिमय करुन शक्यतोवर, महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करील :

[परंतु, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांचे तौलनिक संख्याबळ हे, प्रथमतः पालिका सदस्यांच्या एकूण संख्येला त्या समितीच्या सदस्यांच्या एकूण संख्याबळाने भागून परिगणित करण्यात येईल व तद्नंतर या भागाकाराच्या संख्येने मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांच्या पालिका सदस्यांच्या संख्येस भागण्यात येईल. अशा प्रकारे आलेली संख्या ही त्या त्या मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ असेल. अशाप्रकारे निश्चित केलेल्या तौलनिक संख्याबळाची संपूर्ण संख्या प्रथम विचारात घेऊन, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला जागा वाटून देण्यात येतील. अशा रीतीने जागा वाटून दिल्यानंतर, एक किंवा अधिक जागा वाटून द्यावयाच्या राहून गेल्यास, त्या जागा, तौलनिक संख्याबळातील सर्वात मोठ्या अपूर्णांक संख्येपासून सुरुवात करुन तौलनिक संख्याबळातील अपूर्णांक संख्येच्या उतरत्या क्रमाने, त्या सर्व जागा वाटून दिल्या जाईपर्यंत, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला प्रत्येकी एक याप्रमाणे वाटून देण्यात येतील. ]

परंतु आणखी असे की, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८६ (१९८७ चा महा.२०) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट यांचे तौलनिक संख्याबळ निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरीता, निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट अथवा कोणत्याही पक्षाचे किंवा गटाचे नसलेले निर्वाचित पालिका सदस्य यांना एकत्र येऊन आघाडी किंवा फ्रंट तयार करता येईल आणि अशा आघाडीची किंवा फ्रंटची नोंदणी झाल्यावर, अशा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांना, उक्त अधिनियमाच्या तरतुदी, जणू काहीही आघाडी किंवा फ्रंट निवडणुकीपूर्वीच नोंदणीकृत असल्याप्रमाणे, लागू होतील.

(३) अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्भवल्यास, त्याबाबतीत, महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल.

वरील क.२० (२) मध्ये नमुद केल्याप्रमाणे १६ सदस्य निवडीसाठी दिनांक २२/०२/२०१९ रोजी सभा झाली होती. त्यामुळे दिनांक ३१ जानेवारी २०२० रोजी त्यापैकी ८ सदस्य चिठ्ठया टाकून निवृत्त करण्यात आले. त्यानुसार आजमितीस जे ८ सदस्य स्थायी समितीमध्ये आहेत ते पुढील प्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| १ | शेख मुदस्सर जहॉगीर, | सभापती, स्थायी समिती |
| २ | लोंढे सुभाष सोपानराव | सदस्य, स्थायी समिती |
| ३ | चितळे सोनाली अजय | सदस्य, स्थायी समिती |
| ४ | जाधव सुवर्णा दत्ता | सदस्य, स्थायी समिती |
| ५ | योगीराज शशिकांत गाडे | सदस्य, स्थायी समिती |
| ६ | वाकळे कुमार बबन | सदस्य, स्थायी समिती |
| ७ | आशा शिवाजीराव कराळे | सदस्य, स्थायी समिती |
| ८ | भोसले गणेश पुंडलिक | सदस्य, स्थायी समिती |

काढण्यात आलेल्या चिठ्ठयांनुसार पुढील ८ सदस्य हे दिनांक ०१/०२/२०२० रोजी दुपारी क.२०(४) मधील तरतुदी प्रमाणे निवृत्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कवडे उमेश (गणेश) खंडेराव | सदस्य, स्थायी समिती | शिवसेना |
| २ | घुले अविनाश हरीभाउ | सदस्य, स्थायी समिती | नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी |
| ३ | पवार संध्या बाळासाहेब | सदस्य, स्थायी समिती | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ४ | बारस्कर दिपाली नितीन | सदस्य, स्थायी समिती | नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी |
| ५ | बोरकर शोभा सुधाकर | सदस्य, स्थायी समिती | नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी |
| ६ | खैरे विद्या दिपक | सदस्य, स्थायी समिती | शिवसेना |
| ७ | येवले ज्ञानेश्वर उर्फ अमोल शिवाजी | सदस्य, स्थायी समिती | शिवसेना |
| ८ | कोतकर मनोज शंकर | सदस्य, स्थायी समिती | भारतीय जनता पार्टी |

या निवृत्त झालेल्या सदस्यांच्या जागी नेमणुक करणे कामी कलम २० (५) मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेने स्थायी समितीच्या नवीन सदस्यांची नेमणूक केली पाहिजे.

तथापी वर उल्लेख केलेले निवृत्त झालेले सदस्य क.२० (६) नुसार पुन्हा नेमले जाण्यास पात्र असतील.

सदरची नेमणुक कलम ३१-अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे पक्षीय बलाबलाप्रमाणे प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन करावयाची आहे.

मा.महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय यांचे पत्र क्रमांक संकिर्ण २००८ /१/प्र.क्र.१/२००८ नवि-३२ दिनांक १० जानेवारी २००८ चे मा.नगरसचिव, पुणे महानगरपालिका पुणे यांना पाठविलेल्या पत्रामध्ये पक्षीय बलाबलाप्रमाणे प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देण्याबाबत खालील प्रमाणे नमूद केलेले आहे.-

' महानगरपालिका अधिनियमान्वये गठीत करण्यांत येणा-या समित्यांमध्ये महानगरपालिके तील सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना व गटांना खात्रीपुर्वक पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणुन समित्यांवर बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याबाबत तरतूद अधिनियमात सुधारणे व्दारे करण्यांत आल्यानुसार मा.स्थायी समितीच्या सदस्यांची नेमणुक बलाबलानुसार करण्यांत आली आहे. सदरहू बलाबल कायम असल्यास जे निम्मे सदस्य निवृत्त होत आहेत ते ज्या मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे असतील त्याच मान्यताप्राप्त पक्षाचे नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे अथवा फ्रंटचे नविन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे. जेणे करुन बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्या बाबतच्या तरतूदीची पुर्तता होऊ शकेल.

तसेच कोणत्याही समितीच्या कोणत्याही कारणामुळे रिक्त होणा-या जागांवर निवृत्त झालेला सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा, आघाडीचा किंवा फ्रंटचा असेल त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या, नोंदणीकृत पक्षाच्या, गटाच्या, आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यास नामनिर्देशित करणे अपेक्षीत आहे. मात्र अशा वेळेस पुर्वीच्या तुलनेने पक्षाच्या / गटाच्या तौलनिक संख्येत बदल झालेला नसावा.'

वरिल पत्राचा विचार करता अहमदनगर महानगरपालिकेची एकुण सदस्य संख्या ६८ आहे. तथापि अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ६ अ च्या सदस्या सौ.सारिका हनुमंत भुतकर यांचे अनुसूचीत जमातीचे प्रमाणपत्र मा.सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचीत जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक यांनी रद्द केल्यामूळे साप्रवि/निवडणूक ५४१ दिनांक ०९/१२/२०१९ अन्वये त्यांचे पद भूतलक्षी प्रभावाने म्हणजेच दिनांक १०/१२/२०१८

पासुन रद्द करण्यांत आलेले आहे. त्यामुळे महानगरपालिकेतील पक्षनिहाय संख्याबळ काढतांना ६८ चे ऐवजी ६७ सदस्यांचा विचार करुन काढावा लागेल. ते पुढील प्रमाणे

**एकुण सदस्य संख्या ÷ नियुक्त सदस्य संख्या = प्रती सदस्य मुल्य.**

**६७ ÷ १६ = ४.१८**

| अ. नं. | पक्ष | संख्या बळ | सदस्य मुल्य | पक्ष निहाय सदस्य मुल्य | नियुक्त सदस्य संख्या | | पक्ष निहाय नियुक्त करावयाची सदस्य संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रथम स्तर | व्दितीय स्तर | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | शिवसेना | २३ ÷ | ४.१८ | ५.५० | ५ | १ | ६ |
| २ | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी, आघाडी | १९ ÷ | ४.१८ | ४.५४ | ४ | १ | ५ |
| ३ | भारतीय जनता पार्टी | १४ ÷ | ४.१८ | ३.३४ | ३ | -- | ३ |
| ४ | कॉग्रेस आघाडी | ५ ÷ | ४.१८ | १.१९ | १ | -- | १ |
| ५ | बहुजन समाज पार्टी | ४ ÷ | ४.१८ | ०९५ | -- | १ | १ |
| ६ | समाजवादी पार्टी | १ ÷ | ४.१८ | ०.२३ | -- | -- | -- |
| ७ | अपक्ष | १ ÷ | ४.१८ | ०.२३ | -- | -- | -- |
| | एकुण | | | | १३ | ३ | १६ |

दिनांक २२/०२/२०१९ रोजी १६ स्थायी समिती सदस्य नियुक्त करतांना पुढील प्रमाणे तौलनिक संख्याबळ होते.

**एकुण सदस्य संख्या ÷ नियुक्त सदस्य संख्या = प्रती सदस्य मुल्य.**

**६८ ÷ १६ = ४.२५**

| अ. नं. | पक्ष | संख्या बळ | सदस्य मुल्य | पक्ष निहाय सदस्य मुल्य | नियुक्त सदस्य संख्या | | पक्ष निहाय नियुक्त करावयाची सदस्य संख्या. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रथम स्तर | व्दितीय स्तर | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | शिवसेना | २४ ÷ | ४.२५ | ५.६४ | ५ | १ | ६ |
| २ | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी, आघाडी | १९ ÷ | ४.२५ | ४.४७ | ४ | १ | ५ |
| ३ | भारतीय जनता पार्टी | १४ ÷ | ४.२५ | ३.२९ | ३ | -- | ३ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | कॉग्रेस आघाडी | ५ ÷ ४.२५ | १.१७ | १ | -- | १ |
| ५ | बहुजन समाज पार्टी | ४ ÷ ४.२५ | ०.९४ | -- | १ | १ |
| ६ | समाजवादी पार्टी | १ ÷ ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| ७ | अपक्ष | १ ÷ ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| | एकुण | | | १३ | ३ | १६ |

वरील दोन्ही तक्त्यांमधील तौलनिक संख्याबळाचा विचार करता तौलनिक संख्या बळाच्या पुर्णांक संख्येत कोणताही बदल झालेला दिसुन येत नाही. अपुर्णांक संख्येत झालेल्या बदलामुळे कोणत्याही पक्षाच्या / गटाच्या नियुक्त करावयाच्या सदस्यांच्या संख्येमध्येही बदल झाल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे जे सदस्य दिनांक ३१/०१/२०२० रोजी स्थायी समिती मधुन निवृत्त झालेले आहेत त्यांचे जागी ते ज्या पक्षाचे / गटाचे सदस्य आहेत त्याच पक्षाचे / गटाचे सदस्य नियुक्त करणे आवश्यक आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदी आणि मा.महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय यांचे पत्र क्रमांक संकिर्ण २००८ /१/प्र.क्र.१/२००८ नवि-३२ दिनांक १० जानेवारी २००८ मधील मार्गदर्शनानुसार पुढील प्रमाणे पक्षीय बलाबला नुसार नविन ८ सदस्यांची नेमणुक करावी लागेल.

| **अ.क्र.** | **पक्ष /आघाडी /** | **नेमावयाच्या सदस्यांची संख्या** |
|---|---|---|
| १ | शिवसेना | ३ सदस्य |
| २ | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी | ३ सदस्य |
| ३ | भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस | १ सदस्य |
| ४ | भारतीय जनता पार्टी | १ सदस्य |

तरी मा.स्थायी समितीचे दिनांक ०१/०२/२०२० रोजी दुपारनंतर निवृत्त झालेल्या, या अहवालामध्ये नमुद केलेल्या आठ सदस्यांचे जागी वर उल्लेख केलेल्या बलाबलानुसार मान्यता प्राप्त पक्षाचे , नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे अथवा फ्रंटचे नविन ८ सदस्य नामनिर्देशनाव्दारे स्थायी समितीवर नियमानुसार नेमणेकामी प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयार्थ सादर करण्याच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर अहमदनगर महानगरपालिकेच्या नगरसचिव विभागाकडून दिनांक १३/०३/२०२० रोजीचा फेरसादर रिपोर्ट की,

मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांनी दिलेल्या आदेशानुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ६ अ ची पोट निवडणूक - २०२० दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२० रोजी पार पडली असुन दिनांक ०७ फेब्रुवारी २०२० रोजी निकाल जाहीर झालेला असून त्यामध्ये जाधव पल्लवी दत्तात्रय, ह्या सदर प्रभागातुन भारतीय जनता पार्टी या पक्षामार्फत निवडून आलेल्या आहेत तसेच त्यांचे नांव शासन राजपत्रात प्रसिध्द झाले असुन भारतीय जनता पार्टीच्या गटनेत्या सौ.मालनताई सुरेश ढोणे, यांनी महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण अनर्हता नियम, १९८७ मधील तरतुदीनुसार मा.विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक येथे नोंदणी केलेली आहे. तसेच उपसचिव, महाराष्ट्र शासन यांचे दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० अन्वये श्री.श्रीपाद शंकर छिंदम यांचे अहमदनगर महानगरपालिकेतील विद्यमान

नगरसेवक पद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १३(१) नुसार रद्द करण्यांत आले आहे. त्यामुळे ६७ सदस्यांच्या संख्येनुसार सदस्यमूल्य काढावे लागेल.

**एकुण सदस्य संख्या ÷ नियुक्त सदस्य संख्या = प्रती सदस्य मुल्य.**

**६७ ÷ १६ = ४.१८**

| अ. नं. | पक्ष | संख्या सदस्य बळ मुल्य | पक्ष निहाय सदस्य मुल्य | नियुक्त सदस्य संख्या | | पक्ष निहाय नियुक्त करावयाची सदस्य संख्या. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रथम स्तर | व्दितीय स्तर | |
| **१** | **२** | **३ ४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | शिवसेना | २३ ÷ ४.१८ | ५.५० | ५ | -- | ५ |
| २ | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी, आघाडी | १९ ÷ ४.१८ | ४.५४ | ४ | १ | ५ |
| ३ | भारतीय जनता पार्टी | १५ ÷ ४.१८ | ३.५८ | ३ | १ | ४ |
| ४ | कॉग्रेस आघाडी | ५ ÷ ४.१८ | १.१९ | १ | -- | १ |
| ५ | बहुजन समाज पार्टी | ४ ÷ ४.१८ | ०.९५ | -- | १ | १ |
| ६ | समाजवादी पार्टी | १ ÷ ४.१८ | ०.२३ | -- | -- | -- |
| | एकुण | | | १३ | ३ | १६ |

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदी नुसार पुढील प्रमाणे सुधारीत पक्षीय बलाबलानुसार खालील प्रमाणे नविन आठ सदस्यांची नेमणूक करावी लागेल.

| अ.क्र. | पक्ष/ आघाडी | नेमावयाच्या सदस्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | शिवसेना | २ सदस्य |
| २ | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी | ३ सदस्य |
| ३ | भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस | १ सदस्य |
| ४ | भारतीय जनता पार्टी | २ सदस्य |

तरी मा.स्थायी समितीच्या निवृत्त झालेल्या आठ सदस्यांच्या जागी नविन सदस्यांची नेमणूक करणे बाबतचा प्रस्ताव मा.सभापती, स्थायी समिती यांच्याकडून स्वाक्षरी होवून नगरसचिव विभागाला प्राप्त झालेला नाही. दिनांक ३१/०१/२०२० रोजीच्या सभेचे संपूर्ण व्हीडीओ चित्रीकरण करणेत आलेले आहे. तरी निवृत्त झालेल्या आठ सदस्यांच्या जागी वर उल्लेख केलेल्या पक्षीय बलाबलानुसार मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे अथवा फ्रंटचे नविन आठ सदस्य नामनिर्देशनाव्दारे स्थायी समितीवर नियमानुसार नेमणेकामी वरिल बाबींचा विचार करता सदर बाबत मा.महासभेने निर्णय घेणे उचित वाटते.

सबब प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयास्तव सादर करण्याच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, व्हीडीओ चित्रीकरणा मध्ये झालेल्या कार्यवाहीचे अनुशंगाने मा.महासभेपुढे निर्णयास्तव सादर करण्यांस हरकत नाही.

**मा.महापौर साहेब :-** गटनेत्यांनी पत्र आणून दयावेत. यासाठी ५ मिनीटाचा वेळ देण्यात येत आहे. सभेत मा.सौ.रोहिणी संजय शेंडगे, मा.श्री.संपत बारस्कर, मा.सौ.मालनताई ढोणे, मा.सौ.सुप्रिया धनंजय जाधव, मा.सौ.सुवर्णा जाधव यांनी बंद पाकिटे मा.महापौर यांचेकडे सादर केले. प्राप्त बंद पाकिटे उघडण्यांत आली त्यामध्ये गटनेत्यांनी खालील प्रमाणे स्थायी समिती सदस्यांची नांवे सुचविली.

**गटनेत्या मा.सौ.रोहिणी शेंडगे** यांच्या पत्रानुसार :- मा.श्री.नळकांडे शाम किसन, मा.श्री.पठारे विजय मोहनराव

**गटनेते मा.श्री.संपत बारस्कर** यांच्या पत्रानुसार :- मा.श्री.बोरुडे सागर अर्जुन, मा.श्री.भागानगरे प्रकाश बाबुराव

**गटनेते मा.सौ.सुप्रिया धनंजय जाधव** यांच्या पत्रानुसार :- मा.सौ.सुप्रिया धनंजय जाधव

**गटनेते मा.सौ.मालनताई ढोणे** यांच्या पत्रानुसार :- मा.सौ.शिंदे सोनाबाई तायगा, मा.श्री.कोतकर मनोज शंकर यांच्या नावाचे वाचन केले.

--*--

**ठराव :-**

ठरविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीच्या निवृत्त होणा-या आठ सदस्यांच्या जागी नविन आठ सदस्यांची नेमणूक ऑनलाईन ॲपच्या विशेष सभेव्दारे करणे बाबतच्या सभेमध्ये सर्व पक्षाच्या मा.गटनेत्यांनी नामनिर्देशनाव्दारे सुचविलेल्या पुढील ८ सदस्यांची मा.स्थायी समितीच्या सदस्यपदी विधीग्राहयरित्या नामनिर्देशनाव्दारे नेमणुक झाल्याचे मी घोषित करीत आहे.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | पक्ष |
|---|---|---|
| १ | नळकांडे शाम किसन | शिवसेना |
| २ | पठारे विजय मोहनराव | शिवसेना |
| ३ | बोरुडे सागर अर्जुन | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी |
| ४ | भागानगरे प्रकाश बाबुराव | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी |
| ५ | कुरेशी परवीन आबीद | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी |
| ६ | सुप्रिया धनंजय जाधव | भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस |
| ७ | शिंदे सोनाबाई तायगा | भारतीय जनता पार्टी |
| ८ | कोतकर मनोज शंकर | भारतीय जनता पार्टी |

सुचक : मा.सौ.मालनताई सुरेश ढोणे,
अनुमोदक : मा.श्री.मनोज शंकर कोतकर,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर तथा पिठासीन अधिकारी,
अहमदनगर महानगरपालिका.

**मा.महापौर साहेब :-** गटनेत्यांनी पत्र आणून दयावेत. यासाठी ५ मिनीटाचा वेळ देण्यात येत आहे. सभेत मा.सौ.रोहिणी संजय शेंडगे, मा.श्री.संपत बारस्कर, मा.सौ.मालनताई ढोणे, मा.सौ.सुप्रिया धनंजय जाधव, मा.सौ.सुवर्णा जाधव यांनी बंद पाकिटे मा.महापौर यांचेकडे सादर केले. प्राप्त बंद पाकिटे उघडण्यांत आली त्यामध्ये गटनेत्यांनी खालील प्रमाणे स्थायी समिती सदस्यांची नांवे सुचविली.

**गटनेत्या मा.सौ.रोहिणी शेंडगे** यांच्या पत्रानुसार :- मा.श्री.नळकांडे शाम किसन, मा.श्री.पठारे विजय मोहनराव

**गटनेते मा.श्री.संपत बारस्कर** यांच्या पत्रानुसार :- मा.श्री.बोरुडे सागर अर्जुन, मा.श्री.भागानगरे प्रकाश बाबुराव

**गटनेते मा.सौ.सुप्रिया धनंजय जाधव** यांच्या पत्रानुसार :- मा.सौ.सुप्रिया धनंजय जाधव

**गटनेते मा.सौ.मालनताई ढोणे** यांच्या पत्रानुसार :- मा.सौ.शिंदे सोनाबाई तायगा, मा.श्री.कोतकर मनोज शंकर यांच्या नावाचे वाचन केले.

मा.सौ.शेंडगे रोहिणी संजय शिवसेना गटनेत्या, मा.श्री.संपत विजय बारस्कर, गटनेता नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी आघाडी, मा.सौ.सुप्रिया धनंजय जाधव, गटनेत्या, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, मा.सौ.मालनताई सुरेश ढोणे, गटनेत्या, भारतीय जनता पार्टी, यांनी त्यांच्या पक्षाच्या तौलनिक संख्याबळाच्या आधारावर महानगरपालिका सदस्यांची नामनिर्देशनाने स्थायी समितीच्या नियुक्तीसाठी बंद लखोटयामध्ये मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांच्याकडेस सादर केली.